म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ना. का
दा. क्र. २९६४
BVBK-0402965

बा-वा
२९६५
३१।३।८७

# अमोल कथा

डॉ सौ. लीला दीक्षित

म. धों. कर्वे, ग्रंथालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९६५ दिनांक ३१।३।८७
विषय बा.वा. : क्र. .........

BVBK-0402965

# अमोल कथा

लेखिका

सौ. लीला दीक्षित

मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११०३०

अमोल कथा

प्रकाशिका
सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा.लि.
२५१ क शनिवार पेठ,
पुणे ३०.

(c) सौ. लीला दीक्षित

प्रथमावृत्ती
१ सप्टेंबर १९९३

प्रकाशन क्र. ६१६
ISBN 81-85773-36-X

मुद्रक
श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०८६ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

टाईपसेटिंग
इफेक्टस्
२३ आयडिअल कॉलनी
कोथरुड, पुणे ४११०२९

मुखपृष्ठ व आतील चित्रे
श्री. रमेश भारताल

मूल्य
सोळा रुपये मात्र

'आजी मला गोष्ट सांग' म्हणून भुणभुण करणाऱ्या

माझ्या लाडक्या नातीस,

चि. ऋचास

आजी

(सौ. लीला दीक्षित)

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | अमोल | ५ |
| २) | ऐटोबा | ११ |
| ३) | मी नाही जा! | १६ |
| ४) | मानाचा हार | २१ |
| ५) | स्वत:साठी गाणे | २९ |
| ६) | श्रेष्ठ तुम्हीच | ३४ |
| ७) | मोत्याचा कंठा | ३८ |
| ८) | धर्म | ४३ |
| ९) | रहस्य | ४६ |
| १०) | धनपुत्र | ५० |
| ११) | मनीमाऊचा कोट | ५४ |

# १ अमोल

म. ग्रं. सं. कार्वे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २९६५ दिनांक 3/9/3/0
विषय बा. वा. क्र. .....

हरीकाका साऱ्या कॉलनीचे 'अंकल' होते. कॉलनीतल्या सर्व लहान मुलांचे ते अत्यंत लाडके होते. हरीकाकांना मुले फार आवडायची. माधवपूर तसं फॅक्टरी टाऊन. फॅक्टरीतल्या काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी ते मुद्दाम वसवले गेलेले. फॅक्टरीचे कामाच्या आणि पदाच्या दर्जानुसार श्रेणी असली तरी माधवपूरमध्ये असलेल्या शाळेमध्ये ती श्रेणी मुळीच नव्हती. याला कारणही हरीकाकाच होते. सर्व मुले सारखी होती. तेथे गरीब-श्रीमंत, लहान-मोठा असा भेद नव्हताच.

माधवपूरमध्ये होती एक छोटी शाळा. त्या शाळेच्या समोरच हरीकाकांचे घर होते. हरी काका मिलिटरीमध्ये होते. निवृत्ती घेतल्यावर या छोट्याशा माधवपूरचे ते सिक्यूरिटी ऑफिसर म्हणून आले होते. सायंकाळी ते मोकळे असायचे. फॅक्टरीने दिलेल्या आपल्या छोट्या घरासमोर ते आरामखुर्चीमध्ये काहीतरी वाचीत बसलेले असायचे.

एकदा गम्मत झाली. समोरच्या मैदानावर मुले खेळत होती. प्रदीपने मारलेला चेंडू थेट हरीकाकांच्या अंगणात येऊन आदळला. मुलांना वाटले. छान! आता चेंडू तर मिळणार नाहीच. उलट हा मिलिटरीतील माणूस आपली चांगलीच हजेरी घेणार! पण

घडलं वेगळंच. चेंडू हातात घेऊन ते फाटकाशी आले आणि म्हणाले -

"हं - कॅच."

हवेतील चेंडू समीरने पकडला. समीर आणि प्रदीपची हरीकाकांशी अशी ओळख झाली. हळूहळू इतर मुलेही हरीकाकांच्या अंगणात जमू लागली. शाळा सुटल्यावर चार-पाच मुलांचा चमू हरीकाकांकडे जमू लागला. चाराची दहा, दहाची वीस, विसाची पन्नास मुले कशी झाली हे कुणालाच समजले नाही.

यातून हरीकाकांनी एक बालमंडळच सुरू केले. मुलांना युद्धकथा ऐकायला फार आवडायच्या. प्रथम प्रथम गोष्ट ऐकायला मिळते या आशेने मुले येऊ लागली. यामधूनच हरीकाका मुलांच्या मनावर कितीतरी गोष्टींचे संस्कार करू लागले.

मुलांच्या जीवनात सकाळी लवकर उठण्याचे महत्त्व फार मोलाचे असते. लवकर उठून मुलांनी पळायला आलेच पाहिजे असा दंडक त्यांनी सुरू केला. जेवढी मुले सकाळी पळायला जातील तेवढ्या मुलांनाच सायंकाळी युद्धाची कथा ऐकायला मिळणार; अशी युक्ती हरीकाकांनी योजली. युक्ती नामी निघाली. कथा ऐकायला मिळावी या कारणाने कितीतरी मुले शाळेच्या समोरच्या टेकडीवर पळायला जाऊ लागली. नव्या दमाची, उत्साही अशी ती लहान मुले पळताना पाहून हरीकाकांना फार आनंद व्हायचा.

युद्धाच्या कथा सांगता सांगता हरीकाकांनी मुलांना भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सांगायला सुरुवात केली. स्वातंत्र्याचा तो रोमहर्षक इतिहास ऐकताना मुले भान विसरून जायची. त्यांची चिमकुली मने देशप्रेमाच्या उदात्त भावनेने भरून जायची. हरीकाकांना हेच हवे असायचे. शिक्षण केवळ पोट भरण्यासाठी नसते. उदात्त ध्येय याच वयात मुलांच्या पुढे ठेवायला पाहिजे. हरीकाका सारं

कसं योजने-युक्तीने करीत होते. प्रत्येक मुलाच्या छोट्या छोट्या गोष्टींकडे हरीकाकांचे लक्ष असायचे. संदीप आणि प्रदीपचे अक्षर अतिशय गचाळ होते. हरीकाकांनी सांगितलेल्या कथेचा वळणदार अक्षरात सारांश लिहून आणायचे काम दोघांवर सोपवले. रोज वही पाहून ते दोन चार अक्षरांचे वळण कसे हवे ते सांगायचे. तसे मुलांना परत लिहायला सांगायचे. संदीप आणि प्रदीपचे या नामी युक्तीने अक्षर सुधारले. त्यांच्या आईवडिलांनाही खूप आनंद झाला.

हरीकाका आता अवघ्या माधवपूरचे काका झाले होते. गावातील सारीच माणसे हरीकाकांकडे अत्यंत आदराने पहायची. हरीकाका एकटेच होते. विवाह त्यांनी केलाच नव्हता. गावातील सारी मुले त्यांचीच मुले होती. सणवाराला कितीतरी मुले हरीकाकांकडे डबे आणून द्यायची. त्यामध्ये श्रीखंड, गुलाबजाम, पुरणपोळी, खीर अशी कितीतरी पक्वान्नं असायची. हरीकाका मिस्किलपणे म्हणायचे,

"काय रे? मी तुम्हाला बकासुराचा वंशज वाटतो काय रे?"

आणि ते गडगड हसायचे. थोडंस खाऊन सारी पक्वान्ने जवळच्या गरीब वस्तीत जाऊन वाटून टाकायचे.

असे हरीकाका देवमाणूस. देवमाणूस तरी माणूसच ना? त्यांना दुर्दैवाने असाध्य रोग झाला. सुरुवातीला खरं म्हणजे लक्षातच आलं नाही. कथा सांगता सांगता त्यांना धाप लागायची. मधेच थांबायचे. एक दिवस संदीपने घरी जाऊन आपल्या बाबांना सांगितले. संदीपच्या बाबांनी हट्टाने त्यांना डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी निदान केले ते विलक्षणच. हरीकाकांना फुफ्फुसाचा कॅन्सर झाला होता. परदेशामध्ये जाऊन उपचार केला तरच हरीकाका वाचणे शक्य होते.

गावात एकच चिंतेचा विषय. हरीकाका मात्र अगदी हसतमुख

होते. गावातल्या सर्वच माणसांनी फंड गोळा करून हरीकाकांना बरं करायचंच असा चंग बांधला. सारी मुले एकत्र झाली. माधवपूरची ती छोटी शाळा. शाळेत मुलेच होती तीनशे संदीप आणि प्रदीपने पुढाकार घेतला. साऱ्यांनी एक गुप्त योजना आखली. एक दिवस शाळा सुटल्यावर सर्व मुलांना एकत्रित करून संदीप म्हणाला -

"आपले हरीकाका आजारी झाल्येत. त्यांना वाचवण्यासाठी आपण जीवाची बाजी लावली पाहिजे. त्यांना लोकांच्या घरी जाऊन पैसे गोळा केलेले मुळीच आवडणार नाहीत. आपण स्वावलंबनाने पैसे मिळवायचे. आम्ही एक योजना तयार केली आहे. त्याची माहिती आता प्रदीप तुम्हाला सांगेल."

प्रदीप काय सांगतो ते ऐकण्यासाठी मुले उत्सुक झाली. प्रदीप म्हणाला -

"एक महिन्याने दिवाळी येते आहे. त्यामुळे सर्वांना भेटकार्ड लागतात. तसेच प्रत्येकाच्या घरी आकाशदिवा असतो. कागदाच्या रंगीत माळा लागतात. हे सारं पण मुलांनी करायचे. आपल्या रानडे सरांनी आपल्याला मार्गदर्शन करायचे मान्य केलेय आणि माझे बाबा कागद, रंगीत पेन्सिली, रंग, ब्रशेस, टिकल्या, दोरा वगैरे सर्व सामान घाऊक भावात शहरातून आपल्याला आणून देतील."

सर्व ऐकून मुले खूष झाली. हरीकाकांच्यावर त्यांचे प्रेम होते. मुख्याध्यापकांनाही ही योजना मुलांनी सांगितली. शाळा सुटल्यावर मुलांना शाळेतच काम करायची परवानगी मिळाली. मुले उत्साहाने कामाला लागली. दहा-बारा मुलांचा एक गट, त्यावर एक कल्पक मुलगा गटप्रमुख झाला. प्रत्येक गटाच्या वेगळ्या कल्पना. महिनाभरात शाळेतील कलादालन विविध प्रकारची सुंदर भेटकार्डे, आकाशदिवे रंगीत माळा यांनी भरून गेले.

गावातील सर्व घरांमध्ये जाऊन मुलांनी निमंत्रण दिले. सर्व वस्तूंचे सुंदर प्रदर्शन मांडण्यात आले. मुख्याध्यापकांनी प्रदर्शनाचे उद्घाटन केले. मुलांनी हरीकाकांसाठी हे केलंय ही बातमी आता साऱ्यांनाच समजली.

प्रदर्शन बघायला सारा गाव लोटला. जवळच्या शाळेचीही मुले हा प्रयोग पहायला मुद्दाम आली. भराभर वस्तू विकल्या जात होत्या. रानडे सरांच्या मदतीने प्रदीप, संदीप, रमेश, राजेश पैशाचे काम चोख ठेवीत होते. घेतलेल्या मालाची पावती देऊनच पैसे घ्यायची शिस्त सरांनी सांगितली. तीन दिवसांत सर्व माल संपला. मुलांनी पैसे मोजले. पाच हजार सहाशे रुपये झाले होते. त्यातील सहाशे रुपये सामानाचे प्रदीपच्या बाबांना देण्यात आले. पैशाचे ते पाकीट रानडे सरांच्या हातात परत ठेवीत प्रदीपचे बाबा म्हणाले -

"सर, मुलांनी खूप मेहनत केली आहे. या पैशाचा त्यांना खाऊ आणून द्या."

दिवाळी आली. हरीकाकांना परदेशला घेऊन प्रदीपचे बाबा मुंबईला निघाले. कंपनीने हरीकाकांची परदेशला जाण्याची व्यवस्था केली होती. बरोबर माणूसही दिला होता. अवघा गाव आणि मुले हरीकाकांना पोहोचवायला स्टेशनवर जमली होती. प्रदीप आणि संदीप पुढे झाले. त्यांच्या हातात गुलाबाच्या फुलांचा गुच्छ होता व एक पाकीट होते. पाकीट व गुच्छ हरीकाकांच्या हातात देताना दोघांनाही अश्रू आवरेनात. प्रदीप म्हणाला -

"हरीकाका, हे सारे पैसे आम्ही तुम्ही शिकवल्याप्रमाणे स्वावलंबनाचे मिळवले आहेत."

हरीकाकांचाही आवाज जड झाला. मुलांच्या निर्व्याज प्रेमाने ते सद्गदित झाले. म्हणाले -

“बाळांनो, तुमचे प्रेम पाहून मला बळ आले आहे. विश्वास आला आहे. तुमच्या या निरपेक्ष प्रेमाच्या बळावर रोगाला निश्चित हार खावी लागणार. सहा महिन्यांनी तुमचा हरीकाका युद्धाच्या कथा सांगायला परत माधवपूरमध्ये निश्चित येणार.”

हरीकाकांचे हे शब्द ऐकून साऱ्यांनी आपले अश्रू पुसले. चेहऱ्यावर हसू उमटले. गाडी हलली. हजारो चिमुकले हात हवेत हलत हरीकाकांना निरोप देत होते. हरीकाका प्रसन्न मनाने खिडकीतून हात हलवीत होते.

# २ ऐटोबा

समीरला आता सुटी झाली होती. समीरचे आजोळ कोकणात - वेळणेश्वरला वेळणेश्वर फार सुंदर गाव. अरबी समुद्राच्या किनारपट्टीवर वसलेले. सतत गाज करीत किनाऱ्यावर धडका देणारा निळाभोर समुद्र. आकाशाला भिडणारे माड. लालभडक मातीच्या पायवाटा आणि उन्हात चमकणारे वेळोबाच्या देवळाचे कळस. गावात प्रवेश करता करता वरच्या घाटीच्या वळणावरच गावाचे असं सुंदर दर्शन व्हायचं. समीरला आपलं आजोळ खूप आवडायचे.

मे महिना म्हणजे तर कोकणमधील रसाळ दिवसांचा महिना. आंबे, फणस, काजू, तोरण, करवंद, कोकम या साऱ्यांची लयलूट. परत हे सारं घरंच. मामाची खूपच मोठी शेती होती. त्यामुळे साऱ्यांची अगदी लयलूट असायची. त्यामुळे समीर खूष असायचा.

समीरचा मामेभाऊ सतीश. समीर येणार म्हणून तो खूष असायचा. पण एका बाबतीत समीरविषयी त्याच्या मनात नाराजी होती. समीर शहरात राहणारा. त्यामुळे त्याला अनेक गोष्टी माहीत असायच्या आणि त्या साऱ्या गोष्टींची तो सारखी ऐटी मारीत असायचा. ऐटोबाच होता म्हणा ना तो! त्यामुळे प्रत्येक गोष्टीत तुला हे येते का? की बिचाऱ्या सतीशला नाही असंच उत्तर द्यावे लागे.

यंदा एक गंमत झाली होती. सतीशचा मावसभाऊ पराग पण

त्यांच्या घरी आला होता. समीर पुण्याहून यायच्या आदल्या दिवशीच पराग नाशिकहून आला होता. भलताच स्मार्ट होता. सतीशला आनंद झाला आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आल्यापासून तो शहरात राहणारा असूनही ऐट मारणारा नव्हता.

दुसऱ्या दिवशी पुण्याहून समीर आला. सर्वांनी न्याहरी केली आणि त्रिकूट वाडीमध्ये भटकायला बाहेर पडले. समीरची टकळी सुरू झाली.

"बरं का सतीश, तू कधी टी.व्ही.मध्ये काम केले आहेस?"

"नाही रे बाबा आणि आमच्याकडे इथे कुठे आहे टी.व्ही.?"

"म्हणजे नाहीच केलंस."

"हो नाही केलं."

"मला यंदा शंकर्स विकलीच्या चित्रकलेत बक्षिस मिळाले. तुला मिळाले का?"

"हा कोण शंकर्स?" सतीशने सहज विचारले.

"काय तुला शंकर्स विकली पण ठाऊक नाही? किती अडाणी रे तू सतीश."

सतीशने चेहरा टाकला. जवळच पराग होता. त्याला राग आला. त्याने मनात ठरवले. या ऐटोबाची चांगलीच जिरवायची.

नंतर दिवसभर सतीश गप्प-गप्पच होता. दुपारच्या वेळी समीरने हातात एक गोष्टींचे पुस्तक घेतले. सतीशने सहज म्हटले, "समीर. पाहू दे ना पुस्तक."

"अहा रे. इंग्लिश आहे ते. येते का वाचता?" सतीश ओशाळला. जवळच पराग होता. त्याला राहवले नाही. तो म्हणाला,

"इथे इंग्लिश मिडीयमची शाळा नाही. यंदापासून तर त्यांना इंग्रजी विषय सुरू झालाय आणि सारखी ऐटी कशाला मारायला हवी? अशा कितीतरी गोष्टी आहेत ज्या सतीशला येताहेत पण

तुला मुळीच येत नाहीत.''

''अरे जा! पराग तू कशाला त्याची तरफदारी करतोयस?''

पराग सतीशला घेऊन न बोलता अंगणात गेला.

''हे पहा सतीश. या समीरची आपण चांगलीच जिरवू या.''


''अरे पण कशी?''

''त्याला पोहता येत नाही. झाडावर चढता येत नाही. अंधाराची त्याला भीती वाटते. मी गेल्या चार दिवसांत सारं हेरून ठेवलंय.''

''पण त्याचं काय?''

''त्याची गंमतच बघ आता!''

सायंकाळी नेहमीप्रमाणे त्रिकूट समुद्रकिनाऱ्यावर फिरायला निघाले. वाडीत गेल्यावर परागच्या सांगण्यावरून सतीश एका छोट्या माडावर चढला. दोन शहाळी त्याने पाडली.



समीरने विचारले, "हे काय, दोनच शहाळी?"

सतीश म्हणाला, "हो! तुला सारं येतंच. तू पाडून घे ना!"

समीरचा चेहरा पडला. तो काहीच बोलला नाही.

दोघांनी शहाळी खाल्ली. सतीशला बरे वाटत नव्हते असे करणे. परागने डोळ्याने खूण करून त्याला दटावले.

तिघेजण समुद्रावर गेली. सतीश व पराग समुद्राच्या पाण्यात डुंबू लागले. समीर काठावर उभा होता. त्याच्या मनात आलं - "खरंच. आपल्याला पोहायला येत नाही. समीर किती छान पोहतोय."

इतक्यात एक लाट समीरच्या पायापाशी आली. त्याचा तोल गेला आणि लाटेबरोबर तो गटांगळ्या खाऊ लागला. सतीशने पटकन् पुढे होऊन त्याला हात दिला. काठावर आणले. बोलला मात्र काहीच नाही.

तिघेही घरी यायला निघाले. खूपच अंधार पडला होता. माडाच्या गर्द राईत तर अंधार फारच दाट झाला होता. रोज सतीश समीरचा हात धरायचा. पण आज मात्र पराग व सतीश पुढे एकमेकांचे हात धरून झपझप चालत होते. समीर पाण्यात पडल्याने धास्तावला होताच. त्यातच अंधारात चालायचे म्हणजे त्याची भीतीने गाळणच उडाली होती. शेवटी तो अगदी रडवेला झाला. त्याने हाक मारली -

"सतीश."

सतीशने चालता चालताच उत्तर दिले.

"काय समीर?"

"अरे, मला टाकून पुढे नका जाऊ. मला भीती वाटतेय ना?"

पराग मिस्किलपणे म्हणाला,

"छे तुला कशी भीती वाटेल? तू तर सर्वज्ञ. तुला सारं येतं ना?"

"नाही रे बाबा. चुकलं माझं. मला न येणाऱ्या पुष्कळ गोष्टी सतीशला पण येताहेत. मी नाही ऐट करणार आता."

सतीश चटकन मागे आला. समीरच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणाला- "चल. घाबरू नको. मी आहे ना सोबतीला!"

तिघेही एकमेकांचा हात धरून घराच्या दिशेने चालू लागले.

# ३ मी नाही जा!

जयेश तसा हुशार मुलगा होता. अभ्यासात हुशार होता. खेळण्यात पटाईत होता. पोहण्यात तरबेज होता. चित्रंही छान काढायचा. पण एकच गोष्ट त्याच्यामध्ये वाईट होती आणि ती म्हणजे त्याला अजिबात कसलं वळण नव्हतं. कोणतीही गोष्ट सांगितली की त्याचे एकच पालुपद सुरू असायचं, "मी नाही जा!"

जयेशच्या आईची मैत्रीण सुलू आली होती. ती होती प्राध्यापिका. पुणे विद्यापीठामध्ये कामासाठी आली होती. ती बालमैत्रीण या नात्याने जयेशच्याच घरी उतरली होती.

दुसरा दिवस उजाडला. जयेश सकाळी उठला. पांघरुणाची घडी न करता आपला गॅलरीत उभा! आईने हाक मारली.

"जयेश, चादरीची घडी कर पाहू."

"मी नाही जा!"

आता मैत्रीण आलेली, घरात पसारा नको आणि कुठे वाद घाला म्हणून आईने चादरीची घडी केली. सुलू मावशी सारं न्याहाळीत होती. नंतर सकाळच्या वेळात जयेशचे 'मी नाही जा!' चे गाणे सतत चालू होते मधून मधून.

"जयेश, दूध प्यायलेला ग्लास धुवून ठेव पाहू."

"अे आईऽ आता नाही हं."

"जयेश रात्री वाचताना तसाच झोपलास. पुस्तकं तशीच टाकलीस.

आवर पाहू."

"मी नाही जा! मी आता कॉमिक्स वाचतोय ना?"

"जयेश, शाळेचे कपडे धुवायला टाक पाहू."

"अे आई. आता टी.व्ही.वर कांबळेची सेंच्युरी होणार आहे. माझं पहायचं चुकलं म्हणजे? मी नाही हं आता करणार."

"जयेश बुटाला सकाळीच पॉलीश करून ठेव. रोज शाळेत जाताना तुझा दंगा."

"हे काय ग आई? मी महत्त्वाच्या कामात असलो की काय ग तू काम सांगतेस. मी नाही जा."

शेवटी जयेशच्या आईलाच लाज वाटली. चेंडू उसळी मारून परत यावा तसे जयेशच्या आईचे प्रत्येक वाक्य "मी नाही जा" अशा टोल्याने परत त्यांच्यावरच आदळत होते. शेवटी जयेशच्या आईने विचार केला. सुलू आली आहे. तिच्यापुढे आणखी शोभा नको.

दुपारची जेवणं झाली. जयेश खाली अंगणात खेळायला पळाला. दोघीही गप्पा मारीत होत्या. शेवटी सुलूमावशीने विषय काढला. ती जयेशच्या आईला म्हणाली, "हे बघा सुधा. सकाळपासून 'मी नाही जा' ची तबकडी ऐकून माझे कान तर थकले बघ!"

"खरं आहे सुलू. जयेशला कसं वळण लावायचं याचा मला घोर लागलाय. एक गोष्ट ऐकत नाही. आता दहा वर्षे पूर्ण झाली."

"म्हणूनच असं वागतोय तो! त्याला वेळीच कळायला हवी जबाबदारी!"

"पण कशी कळायची ती? रागावून, ओरडून ओरडून सारं झाले. पण त्याचं आपलं ये रे माझ्या मागल्या. तूच सांग सुलू एखादा उपाय."

"उपाय आहे. मी चार दिवस आता राहणार आहेच कामाच्या

निमित्ताने. पण तुझं सहकार्य हवं आणि मन कठोर करायला हवं."

"करायलाच हवं कठोर. तो सुधारला तर पाहिजे."

"हे पहा सुधा. आजपासून जयेशने विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाला हेच उत्तर द्यायचे आपण. "मी नाही जा" म्हणजे त्याचा तो विचार करायला लागेल. एखादी गोष्ट मुलांना मनापासून पटली की मग सुधारणा व्हायला मुळीच वेळ लागत नाही. बघच तू जादू! आणि हो रात्री जयेशचे बाबा आले की त्यांनाही या कटात सामील करून घेऊ. मग बघच तू गंमत."

दुसऱ्या दिवशी प्रयोगाला सुरुवात झाली.

जयेश उठला. बाथरूममध्ये गेला व नेहमीप्रमाणे त्याने हळी ठोकली -

"आईऽ टूथ पेस्ट दे जरा."

"मी नाही रे बाबा. दिसत नाही मी कामात आहे."

जयेशने न बोलता बाहेर येऊन टूथपेस्ट घेतली.

"आईऽ कपडे दे."

"मी नाही जा. घे तुझे तूच."

"आई. माझी गणिताची वही सापडत नाही. जरा शोधून दे ना आणि कालपासून माझी पेन्सिल पण सापडत नाही ती पण दे ना शोधून."

"मी नाही जा. नीट ठेवायला काय होतं?"

आज आईला झालंय तरी काय? एरवी मी शाळेत निघालो की माझ्या मागे मागे करून मला किती मदत करते आई. बूट घालता घालता जयेश परत ओरडला -

"आई डबा भरून दे ना!"

'मी नाही जा' - जयेशच्या आईनं, मन घट्ट करून उत्तर दिले.

जयेश पाय आपटीत तसाच शाळेत गेला. आईचंच मन चुटपुटलं. पण सुलूमावशीने समजूत घातली. "जयेशला समजायला हवं तर असे करायलाच हवे."

संध्याकाळी जयेश शाळेतून आला. आल्या आल्या दप्तर कॉटवर भिरकावले व नेहमीच्या सवयीने ओरडला -

"आई खायला दे."

"मी नाही जा" जयेशच्या आईने शांत आवाजात उत्तर दिले.

जयेश उठला. कपाटातले चार डबे धुंडाळले. लाडू-चिवडा मिळाला तो खाऊन घेंतला व बाहेर पडला. जिना उतरता उतरता विचार सुरू झाला होता. खरंच आज आई असं काय वागतेय? पण नंतर खेळण्यात केव्हा वेळ गेला ते कळलंच नाही.

जेवताना त्याच्याशी फारसं कुणी बोलत नव्हतेच. झोपताना तो बाबांना म्हणाला -

"बाबा; तुम्ही या महिन्यात कॅमेऱ्याला पैसे देणारात ना?"

"मी नाही जा!"

"कम्माल झाली बाबा तुमची. आणि हो, उद्या आमची पतंगाची काटाकाटी आहे. मला पैसे हवेत पतंग आणि मांजा आणायला. द्याल ना पैसे?"

"मी नाही जा!" धीम्या आवाजात उत्तरले.

गेले दोन दिवस हे असंच चाललं होतं. आपल्या प्रत्येक प्रश्नाला आई-बाबा 'मी नाही जा' असंच उत्तर देताहेत. तो काहीसा रागावला. फुरगंटून झोपी गेला. सकाळी उठला. "आई पेस्ट दे." स्वयंपाकघरातून आईचा आवाज आला - "मी नाही जा, घे तूच शोधून."

एक क्षण जयेश चक्रावलाच. आई-बाबांना झालंय तरी काय कालपासून. पण कालपासून या तीन शब्दांनी माझं डोकं उठलंय. पण हे शब्द तर आपल्याला खूप ओळखीचे आहेत. मग जयेशला

आठवले. आईने, बाबांनी काही सांगितले की मी सारखंच "मी नाही जा." असं उत्तर देतो. आणि ती सांगते तरी काय काम? दप्तर नीट ठेव, बुटाला पॉलीश कर, रुमाल धुवून ठेव. खरं म्हणजे ही सारी माझीच तर कामे. पण आपलं पालुपद एकच "मी नाही जा!" खरंच! काहीतरी चुकतंच आहे आपलं. रात्री खूप वेळ जयेशला झोप येत नव्हती. आई बाबा गेले दोन दिवस 'हे कर, ते कर' काहीच सांगत नव्हते. रागावले असणार! छे छे! बाकी कोणी रागावले तर चालेल पण आई बाबाऽ... जयेशच्या डोळ्यांत पाणी आले. त्याच अवस्थेत तो झोपी गेला.

दुसऱ्या दिवशी जयेश उठला. उठल्यावर त्याने न सांगता चादरीची घडी केली. चमकून आईने सुलूकडे पाहिले. सुलूमावशीने पत्र लिहिले होते. ती आईला म्हणाली,

"सुधा. जरा पोस्टात पत्र टाकून येते."

जयेशच्या आईच्या मनात आलं होतं. जयेशला म्हणावं. पण तिने मन आवरले. पण एक नवलच घडले. जयेश पुढे झाला व म्हणाला -

"मावशी. मी येतो ना टाकून पत्र. तुला नको जिने उतरायला."

"नको. मी टाकीन माझे."

आता मात्र जयेशचा बांध फुटला. तो आईच्या कुशीत शिरत म्हणाला - "आई तू माझ्याशी बोल ना. मला काम सांग."

आईने जयेशला जवळ घेतले.

"आई, माझा "मीनाजा" कायमचा पळून गेला बरे!"

"मीनाजा कोण?"

"मी नाही जा"

जयेशच्या या वाक्याने सारीच हसू लागली.

# ४ मानाचा हार

अमरपूर नावाचे ते सुंदर राज्य होते. राज्यामध्ये धनधान्याची सुबत्ता होती. राजा जयवर्धन अत्यंत प्रजाहिततत्पर राजा होता. तसाच तो गुणांचा चाहता होता. राज्यामध्ये सर्व कलांचा योग्य आदर होता. त्यामुळे नृत्य, संगीत, साहित्य अशा कलांची उत्तरोत्तर प्रगती होत होती. सर्व कलांना राजाश्रय असल्यामुळे वेगवेगळ्या प्रांतांतून अनेक कलांमधील गुणी मंडळी सतत पुढे येत होती. राजा अत्यंत धर्मप्रिय होता. त्याची धर्माची व्याख्याही व्यापक होती. दरवर्षी राज्यामधील धर्मशास्त्रपारंगत अशा व्यक्तीची निवड करून त्याला 'धर्मविद्' हा बहुमान देण्यात येत असे. त्यासाठी एक समिती दरवर्षी नेमली जाई व दसऱ्याच्या म्हणजे सरस्वतीपूजनाच्या दिवशी खूप मोठ्या समारंभाने या पंडिताचा सन्मान करून त्याला ही पदवी बहाल करण्यात येई.

असा योग्य पंडित निवडणे हे खरोखरच अत्यंत कठीण काम होते. परंतु राज्यामधील वयोवृद्ध व अनुभवी मंडळी हे काम अत्यंत कसोशीने करीत. दरवर्षी 'यंदा ही पदवी कोणाला मिळणार ?' याबद्दल राज्यामध्ये पाडव्यापासून लोकांमध्ये उत्सुकता असे व काही मंडळी हेतुपुरस्सर हा बहुमान आपणाला मिळावा म्हणून खटपटीत असत. परंतु केवळ खटपटीने मिळणारा हा मान नव्हताच

मुळी.

यंदाही हा मान कुणाला मिळणार याची उत्सुकता पसरली होतीच. लोकांच्या तोंडी यंदा नीलकंठ नावाच्या एका दानशूर माणसाचे नाव फार होते. परंतु राज्यातील जाणकार मंडळी म्हणत.

"केवळ दानशूरपणा म्हणजे धर्मज्ञान नव्हे. नीलकंठपेक्षा आसावरी नदीच्या तीरावर रहाणारा तो गरीब ब्राह्मण वासुदेवच खरा 'धर्मविद्' आहे. यंदाचा बहुमान त्यालाच मिळायला पाहिजे."

राज्यातील अनुभवी व्यक्तींचे परीक्षक मंडळ कामाला लागले होते. हे काम त्या व्यक्ती अगदी चतुराईने करायच्या.

नीलकंठ हा त्या गावातील अगदी अत्यंत श्रीमंत माणूस. वृत्तीने तसा खूपच दानशूर होता. एक दिवस सायंकाळच्या वेळी त्याच्या घरी दोन वयस्क म्हातारे आले. ओसरीवर नीलकंठ कसल्यातरी हिशेबात गुंतलेला दिसला. नोकराने त्यांना ओसरीलगतच्या मोठ्या पडवीतील झोपाळ्यावर बसायला सांगितले. दोघे झोपाळ्यावर विसावले. थोड्याच वेळात नीलकंठ बाहेर आला.

आल्या आल्या दोघाहीजणांनी त्यांना नमस्कार केला. नीलकंठ म्हणाला -

"तुमचे काय काम आहे? माझ्या दानशूरपणाची कीर्ती ऐकून कोणीही सोम्यागोम्या माझे घरी दान मागायला येऊ लागला आहे."

दोघांनी एकमेकांकडे पाहिले. 'स्वत:च्या दानशूरपणाचा भलताच अहंकार या माणसाच्या मनात रुजलेला दिसतोय.' त्यांच्या मनात विचार आला.

त्यातील एक वयस्क पुरुष म्हणाला -

"महाराज, आम्ही दोघे आपल्याच राज्यातील पाडळी नावाच्या अत्यंत लहान खेड्यातून आलो आहोत. गेले दहा वर्षे आम्ही

तिथे एक छोटीशी शाळा चालवीत आहोत. मुलांची संख्याही आता वाढली आहे. तरी शाळेची इमारत आपण बांधून द्यावी अशी विनंती करायला आम्ही आलो आहोत. सध्या शाळा आमच्या अंगणात व ओसरीवरच आम्ही घेतो.''

नीलकंठाने प्रश्न केला -

''तुमच्या शाळेचे नाव कधी ऐकले नाही.''

''हो महाराज, शाळा अजून तशी नावारूपाला आलेली नाही. फारच छोटे खेडेगाव आहे ना?''

इतक्यात झोपाळ्यामागच्या एका खोलीतून खोकल्याचा आवाज आला व मागून शब्द उमटले, -

''अरे, कोणी आहे का? मला पाणी द्या रे!''

नीलकंठाने रागाने खोलीकडे पाहिले व नोकराला म्हणाला - ''त्या म्हातारीला पाणी दे! घरी कोणी पाहुणे आहेत जरा नीट वागावे तर सदान्‌कदा ओरडत असते.''

नीलकठच्या चेहऱ्यावर एक सूक्ष्मशी आठी उमटलेलीही दोघांच्या लक्षात आली. थोड्या वेळाने नीलकंठ म्हणाला,

''तुमच्या शाळेसाठी काही देता येईल असे मला वाटत नाही.''

दोघेही नमस्कार करून अंगणात आले. बाहेर नोकर उभा होता. त्याला हलक्या स्वरात त्यांनी विचारले,

''मघा पाणी मागणारी म्हातारी कोण?''

नोकराने उत्तर दिले -

''आईसाब हायेत त्या. घरात सारी वसवस करतात त्यांच्यावर. म्हातारी पडून असते कोपऱ्यात.''

दोघेही रस्त्यावरून चालू लागले. ते दोघे वयस्क म्हातारे म्हणजे दुसरे - तिसरे कोणी नसून 'धर्मविद्' मंडळाचे परीक्षक, राजसेवक श्रीरंगराय व श्रीपतराय होते.

श्रीरंगराय म्हणाले -

"पाहिलंत श्रीपतराय, पाणी मुळीच खोल नाही. सारा अहंकाराचा खळखळाट. आपल्या शाळेला नाव नाही म्हणून याने देणगीही नाकारली. याचा दानशूरपणा केवळ स्वत:च्या नावासाठी."

श्रीपतराय म्हणाले,

"ते तर खरंच! पण वागणं वरवर गोड वाटलं तरी खरं पितळं उघडं पडलंच ना? आपल्या म्हाताऱ्या आईचा असा अधिक्षेपाने उच्चार करणारा हा कसला धर्मविद्?"

श्रीपराय आणि श्रीरंगराय तसेच आसावरी नदीच्या तीरावर पोहोचले. दिवस मावळायला आला होता. त्या छोट्या घराच्या बाहेर सारवलेल्या स्वच्छ अंगणात ते उभे राहिले. त्यांनी आजूबाजूला पाहिले. दारात सुंदर रांगोळी रेखलेली होती. मोगऱ्याची व मदनबाणाची पांढरीशुभ्र फुले फुललेली होती. त्यांच्या सुंदर गंधाने वातावरण सुगंधमय झाले होते.

आणि घरामधून मंद स्वरातून संमिश्र आवाज कानावर पडत होता.

> "ॐ सहनाभवतु।
> सहनौ भुनक्तु:।
> सहवीर्यं करवावहै:।"

त्यांनी दारावर टक्‌टक् केली. वासुदेव बाहेर आला. अत्यंत हसतमुखाने त्याने त्या दोघांचे स्वागत केले. पडवीत घोंगडी घालून त्याच्यावर बसण्याची विनंती केली.

श्रीरंगराय म्हणाले,

"आम्ही दोघे गरीब शिक्षक आहोत. आपल्याच राज्यातील पाडळी गावातून आम्ही आलो आहोत. आमच्या गावातील शाळेसाठी काही मदत मागायला आम्ही आपणाकडे आलो आहोत."

वासुदेव म्हणाला,

"महाराज, मी जरूर मदत करीन पण एका अटीवर. आजची रात्र आपण माझ्या घरी भोजन केले पाहिजे. आपल्यासारख्या पुण्यपुरुषांचे पाय माझ्या घराला लागलेत हे मी माझे भाग्य समजतो.'

दोघांनी एकमेकांकडे पाहिले. वासुदेवच्या ऋजू बोलण्याने व स्वच्छ मनाने ते भारावून गेले. रात्री स्वयंपाक झाला. माजघरात सर्वजण भोजनास बसले. समोरच्या पंक्तीत तेजस्वी मुद्रेचे तीन तरुण बसले होते. श्रीपतरायांनी विचारले,

"हे आपले सुपुत्र वाटतं?"

"हो! हा राम आमच्या घरात जन्माला आला. पण हे दोघे परमेश्वराने बाहेरून धाडले."

"म्हणजे?"

- दोघांनी एकदम विचारले.

वासुदेव म्हणाला,

"महाराज, राम हा माझा मुलगा. परंतु सात - आठ वर्षांपूर्वी आपल्याच राज्यातील एका खेडेगावात काही धर्मकार्यासाठी गेलो असता एका ब्राह्मणाकडे ही दोन रत्ने मला सापडली. यांचे वडील अत्यंत गरीब. खेड्यात शिकायची सोय नाही व शहरात पाठवायची ऐपत नाही. म्हणून या दोन मुलांना मी घेऊन आलो. येथील प्राज्ञपाठशाळेत दोघेही माझ्या मुलांबरोबर शिकतात व मीही घरी शिकवतो. माझ्या घरीच राहतात."

श्रीपतराय व श्रीरंगराय यांनी एकमेकांकडे अर्थपूर्ण नजरेने पाहिले.

भोजन उरकल्यावर सर्वांच्या ओसरीवर गप्पा रंगल्या. किंबहुना श्रीपतराय व श्रीरंगराय यांनी त्या मुद्दाम रंगविल्या. त्यांना वासुदेवाकडून काही जाणून घेण्याची इच्छा होती. गप्पांच्या ओघात श्रीरंगराय सहज म्हणाले,

"यंदा 'धर्मविद्' हा बहुमान कोणाला मिळेल असं तुम्हाला वाटतं?"

वासुदेव शांतपणे म्हणाला,

"तसं नक्की सांगता नाही येणार. पण राजाचे परीक्षक मंडळ योग्य माणसाची निवड करील हे निश्चित!"

श्रीरंगराय म्हणाले,

"खरं म्हणजे अशी व्यक्ती शोधून काढणे हेच कठीण नाही का? कारण धर्माची व्याख्याच करणं कठीण आहे. असं नाही तुम्हाला वाटतं?"

वासुदेव म्हणाला,

"धर्माच्या व्याख्या करीत बसण्याचा प्रपंच हवाच कशाला? माणसाचे मन मोठे बनवणारा तो धर्म, दुसऱ्याला निर्मल आनंद देणे हे पुण्य आणि दुसऱ्याला दुःख देणे हे पाप."

धर्माची व पापपुण्याची इतकी सहजसुंदर व व्यवहारसुलभ व्याख्या ऐकून दोघेही मनातून भारावून गेले.

सकाळ झाली. दोघेही जायला निघाले. वासुदेवाने एक छोटा बटवा आणला व त्यांच्या हातात देत म्हणाला,

"महाराज, गेल्या आठवड्यात दारातल्या फणसांचे हे आलेले काही पैसे मी आपल्या शाळेसाठी देत आहे. त्याचा स्वीकार व्हावा. आपले कार्य मोठे आहे तरी माझी ही फुलाची पाकळी त्यामध्ये असू द्या."

सर्वांचा निरोप घेऊन श्रीपतराय व श्रीरंगराय राजवाड्याच्या दिशेने चालत होते. योग्य माणसाची निवड करण्यात आपल्याला यश मिळाले म्हणून दोघांच्याही चेहऱ्यावर समाधान व आनंद उमटला होता.

दसऱ्याचा दिवस उजाडला. अमरपूर नगरी आज आनंदाने

न्हाऊन निघाली होती. 'धर्मविद्' पदवी आज समारंभाने दिली जाण्याचा समारंभ वाड्यात सायंकाळी होणार होता. ही पदवी फार सन्मानपूर्वक दिली जाई. दुपारच्या वेळी राजाचा गजराज सोंडेमध्ये विजयी माळ घेऊन मिरवणुकीने निवड झालेल्या माणसाच्या घरी जाई व त्याच्या गळ्यात, 'धर्मविद्' पदाची ही माळ घालून राजरस्त्यावरून त्या व्यक्तीची मिरवणूक त्याच हत्तीवरून निघे व दरबारात सर्व नागरिकांच्या साक्षीने त्याला 'धर्मविद्' पदाची वस्त्रे व खूप मोठे मानधन द्रव्यरूपाने देण्यात येई.

नीलकंठला आपली निवड निश्चित होणार याची खात्री होती. सकाळपासून त्याच्या घरात लगबग सुरू झाली होती. अंगणात रंगीत रांगोळ्या घातल्या होत्या. घरात पताका लावल्या होत्या. मेवामिठाईंनी ताटे सज्ज होती.

मिरवणूक जवळ आली. तशी नीलकंठ मोठ्या रुबाबाने अंगणात उभा राहिला. उगाच लोकांना मला आतून बोलावण्याचाही प्रयास नको. परंतु घडले ते नवलच! मिरवणूक नीलकंठच्या घरावरून सरळ पुढे गेली. नीलकंठला राग आला व विषादही वाटला. "माझी निवड झाली नाही; मग आहे तरी कोणाची?"

उत्सुकतेने व असूयेने तोही मिरवणुकीत मिसळून चालू लागला. गजराज सोंडेमधील घवघवीत फुलांच्या हाराला हेलकावीत चालला होता. मागे परीक्षक मंडळ व नागरिक. शेवटी मिरवणूक आसावरी नदीच्या तीरावर आली. वासुदेव व त्यांच्या घरची मंडळी अंगणात उत्सुकतेने उभी होती. इतक्यात काय आश्चर्य! गजराज वासुदेवच्या अंगणात आला व आपल्या सोंडेतील घवघवीत हार त्याने वासुदेवाच्या गळ्यात घातला. वासुदेव भांबावून गेला. आपल्या गळ्यातील हार काढीत तो म्हणाला -

"अहोऽ अहोऽ काहीतरी चूक होत्येय."

इतक्यात श्रीपतराय व श्रीरंगराय पुढे आले व हार वासुदेवच्या गळ्यात परत सारखा करीत म्हणाले -

"वासुदेव, निवड योग्य झाली आहे. ओळखलं नाही आम्हाला ?"

वासुदेवाने पाहिलं. काही दिवसांपूर्वी रात्री आपल्या घरी पाडळीच्या शाळेसाठी मदत मागण्यासाठी आलेले म्हातारे अतिथी हेच तर नव्हेत ना? वासुदेव ओळखीचे हसला. सर्वांनाच आनंद झाला. जाणकार मंडळी परीक्षक मंडळीने योग्य व्यक्तीची निवड केली म्हणून धन्यवाद देत होती. तर नीलकंठ मात्र मनात धुसफुसत होता.

वाद्यांच्या गजरात गजराजावर बसलेला 'वासुदेव' मात्र भांबावलेलाच दिसत होता. मनात म्हणत होता,

"मी कसला धर्मविद् ?"

पण श्रीरंगराय व श्रीपतराय मोठ्या समाधानाने मागून चालत होते. 'खरा धर्मविद् लाभला म्हणून !'

५

# स्वत:साठी गाणे

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल ... विभाग.
दा. क्र. २९६५ दिनांक ३।३।९४
विषय बा. वा. क्र. ........

मोगलसम्राट अकबर कलाप्रेमी राजा होता. कलावंताचा त्याच्या दरबारात नेहमीच सन्मान होई. त्याच्या दरबारात अनेक कलावंत राजाश्रय म्हणून राहिले होते. दरबारात अनेक कलावंत होते. त्यांपैकी तानसेन असाच एक कलावंत. संगीत म्हणजे तानसेन आणि तानसेन म्हणजे संगीत. असे लोक म्हणत. तानसेन गायला लागला की प्रजा डोलू लागे. दरबारात त्याने 'दीप' राग आळवला तर दरबार तेजाने उजळून निघाला अशी त्याच्या संगीताची किमया. तानसेनवर अकबराचा फार जीव. दरबारातील प्रत्येक आनंदाचा क्षण तानसेनाच्या संगीताने उजळून निघायचा. अकबर खूष व्हायचा पण तानसेन त्याच्यावर उत्तर द्यायचा -

'छे! छे! माझं कसलं गाणं? माझ्या गुरुजींचं गाणं तुम्ही ऐकायला पाहिजे.' अकबराला वाटायचे. तानसेन गुरुजींविषयी आदराने असे उद्‌गार काढत असावा पण एकदा मात्र गंमत झाली.

महाराजा अकबरचा वाढदिवस होता. सकाळपासून प्रजाजन आपल्या लाडक्या राजासाठी नजराणे घेऊन येत होते. राजवाडा माणसांनी फुलून गेला होता. त्याला आणखीही एक कारण होते. कारण आज दरबारात तानसेनाचे गाणे होते. महाराजा अकबर सिंहासनावर विराजमान झाला. सर्वांनी राजाला अभिवादन करून

त्याचा जयजयकार केला. राजाच्या अनुज्ञेने तानसेन मैफिलीला सज्ज झाला.

दरबारामध्ये मध्यभागी पांढऱ्या स्वच्छ बिछायतीवर लाल रंगाचा अप्रतिम जरीकाम केलेला गालिचा होता. मागे पांढरेशुभ्र लोड होते. तानसेन गालिच्यावर येऊन बसला, सारंगियाने सारंगीचे सूर छेडले ! लखलखीत मयूराची वेलपत्ती असलेले दोन तंबोरे तानसेनकडे पहात होते. अकबराला कुर्निसात करून तानसेनचा काळजाची वीणा छेडणारा आवाज घुमला - सुगंधाने गाभारा भरावा तसा. सर्वांच्या तोंडून 'ओऽ होऽ' चे शब्द फुटले आणि नंतर तब्बल तीन तास तानसेनने सारी सभा नादब्रह्मात अक्षरशः बुडवून टाकली. 'पूर्वा कल्याण' असा अप्रतिम झाला, की शेवटच्या अस्ताईमधून माणसे स्वतःतच इतकी रंगून गेली की गाणे संपलं केव्हा हेही त्यांना समजले नाही.

महाराजा अकबर प्रसन्न मनाने उठला. सुवर्णाचे झाकलेले ताट घेऊन सेवक पुढे आला. अकबराने स्वतः पुढे होऊन नवरत्नांचा कंठा असलेलं ते ताट तानसेनच्या हातात दिले. ते स्वीकारताना तानसेन परत म्हणाला,

'माझं गाणं कसलं घेऊन बसलात ? माझे गुरू स्वामी हरिदास यांचं गाणं तुम्ही ऐकायला पाहिजे. त्यापुढे माझं गाणं काहीच नाही.''

आता मात्र अकबर आश्चर्यचकित झाला. इतके अप्रतिम गाऊनही हा तानसेन म्हणत होता. मी गुरुजीपर्यंत अजून पोहोचलो नाही. राजाच्या मनात कुतूहल जागे झाले. याच्यापेक्षा उत्तम गाणे असेल तरी कसे ?

दरबार संपल्यावर राजा अकबर तासनसेला म्हणाला,

'तानसेन, मला स्वामी हरिदासांचं गाणं ऐकण्याची फार इच्छा

झाली आहे, ऐकवशील?'

तानसेन चिंतातुर चेहऱ्याने म्हणाला, ''महाराज तीच गोष्ट फार कठीण आहे. माझे गुरुजी राहतात अरण्यात. अखंड ज्ञानसाधनेत असतात ते. माझ्यावर कृपा म्हणून ते मला भेटतात तरी. आता तुमची भेटही कठीण मग त्यांचं गाणं ऐकणं तर लांब राहिलं.'

अशक्यता ही गोष्ट अकबराच्या लेखी ठाऊकच नव्हती. तो तानसेनाला म्हणाला,

'तानसेन. कसंही कर! पण मला हरिदासाचं गाणं ऐकवच तू.'

त्याच्या शब्दामधली उत्कटता तानसेनला जाणवली. तानसेन हसून म्हणाला,

'तुमची उत्कट इच्छा असेल, तर एक उपाय आहे, पण...'

'पण काय?' अकबर कुतूहलाने उद्‌गारला, सांगावे की नाही याचा निर्णय होईना. शेवटी राजाचा फारच आग्रह पडला तेव्हा तानसेन हलक्या आवाजात म्हणाला,

'महाराज तुम्हाला गाणं ऐकायचंच असेल, तर माझा हुजऱ्या म्हणून यावं लागेल.'

'काय?...' अकबर ताड्‌कन उठला.

हात जोडीत तानसेन म्हणाला,

'महाराज, माझ्यावाचून स्वामी कुणाला भेटत नाहीत. तेव्हा मला तर हाच उपाय दिसतो. म्हणून मी सुरुवातीला गाणं ऐकण्याची शक्यता नाही म्हणालो, महाराज माफ करा मला.'

आता अकबराचे कुतूहल शिगेला पोहोचले. तो म्हणाला,

'तानसेन, हरकत नाही. मी येईन गाणे ऐकायला तुझ्याबरोबर.'

आता आश्चर्य करण्याची पाळी तानसेनवर होती. पण त्याला महाराजांचे कौतुक वाटले. केवढे हे कलेवरचे प्रेम! साक्षात राजा

हुजऱ्या व्हायला निघाला. सत्ता ज्ञानापुढे नम्र झाली.

दुसऱ्या दिवशी तानसेन व हुजऱ्याच्या वेषात अकबर हरिदासांच्या आश्रमात गेले. हुजऱ्याच्या वेषात असलेला अकबर आश्रमाच्या दाराशी उभा राहिला. तानसेन आश्रमात गेला. दारामधून अकबराने स्वामी हरिदासाचे दर्शन घेतले. तानसेनने स्वामींच्या चरणांना स्पर्श केला, नंतर दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. स्वामी हरिदास संगीताबद्दल आत्मीयतेने बोलत होते, ते म्हणाले,

'झाडांची सळसळ, समुद्राच्या गरजणाऱ्या लाटा, पक्ष्यांची मंदमधुर किलबिल हे परमेश्वराचे संगीत. माणसाने यामधून प्रेरणा घेऊन सुरांचे व्यवस्थापन केले. संगीत म्हणजे परमेश्वराकडे जाण्याचा सोपा मार्ग.'

बोलता बोलता ते तल्लीन झाले व 'बसंत बहार' चे सुरेल सूर हवेत बरसू लागले. अंगावर पारिजातकाचा सडा पडावा तसे ते आत्मगंधाने न्हालेले सूर ऐकता ऐकता अकबर स्वत:चे भान विसरून गेला.

मुलाखत संपली. तानसेन आश्रमाच्या बाहेर आला. अकबर त्या नादब्रह्मात विरघळून गेला होता. तानसेनने हलक्या आवाजात हाक मारली,

'महाराज',

या दिव्यसमाधीतून बाहेर येऊन अकबर बादशहा तानसेनाबरोबर नगराच्या दिशेने चालू लागला. चालता चालता त्याने तानसेनला विचारले,

'तानसेन, स्वामी हरिदासांचे गायन म्हणजे खरोखरच स्वर्गीय आहे. माणसाला स्वत:चे अस्तित्व विसरायला लावणारे गाणे ऐकून मी धन्य झालो आहे. पण काय रे, एवढा आभाळाएवढा गुरू मिळूनही तुझे गाणे मात्र इतके सामान्य कसे राहिले?'

तानसेनच्या ध्यानात आले. आपल्या गुरुजींच्या पासंगालाही आपले ज्ञान नाही हे महाराजांच्या लक्षात आले. तो नम्रतेने म्हणाला,

'महाराज! याचे एक रहस्य आहे. देहभान विसरायला लावणारे हे गाणे मला कसे शक्य होणार?'

'का?' अधीरतेने अकबराने विचारले. तानसेन म्हणाला, 'महाराज, मी केवळ आपल्यासाठी गातो आणि पंडित स्वामी हरिदासांचा गळा असा कुणाचा दास नाही. ते केवळ स्वत:साठीच गातात, आणि म्हणूनच त्यांचे गाणे इतके स्वर्गीय आहे.'

या उत्तराने अकबर अवाक् झाला.

६

# श्रेष्ठ तुम्हीच

अवंतिका नगरी म्हणजे साऱ्या भारताची शान होती. तेव्हा राजे सत्यशिव यांच्या कारकीर्दीत या नगरीचे वैभव अगदी शिखराला पोहोचले होते. सत्यशिव महाराजांनी "हे राज्य परमेश्वराने आपल्याकडे ठेवायला दिलेले निधान" या दृष्टीने राज्यकारभार चालविला होता. त्यामुळे प्रजेचे हित महत्त्वाचे ठरले. विविध कलांना राजाश्रय मिळाल्यामुळे त्यांचा विकास झाला. प्रजा सुखी होती. ज्ञानाला सत्तेपेक्षा प्रतिष्ठा होती. त्यामुळे दरवर्षी विजयादशमीला पंडितसभा भरत असे. ज्ञानसंपन्न पंडितांचा सत्कार केला जाई.

नुकतेच सत्यशिव महाराज निवृत्त झाले होते. गेल्या दोन वर्षांपासून राज्याची धुरा त्यांचे चिरंजीव जयसिंह महाराजांनी उचलली होती. परंतु मुलाची वृत्ती अगदी भिन्न होती. ह्या राज्याचे आपण सर्वश्रेष्ठ मालक आहोत, अशीच जयसिंह महाराजांची कल्पना होती. त्यामुळे सर्वांनी आपला सारखा जयजयकार करावा असे त्यांना वाटे. सन्मान मागून मिळत नसतो. परंतु सत्तेच्या पायी जगातील कोणतीही गोष्ट आपल्या पायाशी येईल, असे त्यांना वाटे. प्रधानमंत्र्यांना ही गोष्ट फार खटकायची.

दरवर्षी विद्वत्सभेत निरनिराळ्या विषयांवर चर्चा व्हायची. राजे सत्यशिव होते तेव्हा तेही विनयाने ती चर्चा श्रवण करायचे.

त्या ज्ञानसूर्याकडे पाहून तृप्त व्हायचे. हे ज्ञानयोगी आपल्या राज्यात राहताहेत याचाच त्यांना मोठा आनंद असायचा. परंतु जयसिंह महाराजांनी मात्र यंदाच्या 'विद्व्‌त्सभेमध्ये मोठा गुंता निर्माण केला होता. त्यांनी सरळ सरळ पंडितांना प्रश्न केला होता, "सर्व जगात श्रेष्ठ कोण?"

आला का प्रश्न? कारण जयसिंह महाराजांना अपेक्षित उत्तर एकच होते की, सर्वांनी म्हणायला हवे होते, "आपणच या सर्व जगात श्रेष्ठ आहात."

परंतु पंडितांना हेच उत्तर देणे अत्यंत अवघड होते. सत्यशील महाराजांच्या कारकीर्दीमध्ये चाळीस वर्षात असा प्रश्न कधी कोणी विचारलाच नव्हता. सर्व सृष्टीवर त्या सार्वभौम परमेश्वराचीच सत्ता आहे. तोच सर्वश्रेष्ठ ही काय नव्याने सांगायची गोष्ट आहे! सर्वांनाच ते माहीत होते.

परंतु या 'सर्वश्रेष्ठ सत्याचाच' आज जयसिंह महाराजांना विसर पडला होता. सत्तेने मनामध्ये अहंकार निर्माण झाला होता व हा अहंकार प्रत्यक्ष परमेश्वराच्याच सत्तेला आव्हान देऊन विचारीत होता,

"सर्व जगात श्रेष्ठ कोण?"

प्रत्यक्ष दरबारात हा प्रश्न जयसिंह महाराजांनी विचारला मात्र... सर्व पंडित अस्वस्थ होऊन गेले, काय द्यावे याचे उत्तर? राजाला श्रेष्ठ म्हटलं नाही तर प्राण गमावण्याचीही शक्यता आणि परमेश्वराचे श्रेष्ठत्व तरी कसे नाकारायचे? ती स्वतःच्या ज्ञानाशी स्वतःशीच प्रतारणा होती. गुंता काही सुटेना. शेवटी एक पंडित भीत भीत उभा राहिला व म्हणाला -

"महाराज, इतका कठीण प्रश्न आतापर्यंत कुठल्याच राजाने विचारला नसेल! या प्रश्नाचे उत्तर द्यायला थोडा अवधी लागेल.

आजपासून पाचव्या दिवशी म्हणजे पौर्णिमेला आम्ही या प्रश्नाचे उत्तर देऊ.''

सभा बरखास्त झाली, सर्व पंडित अस्वस्थ मनाने घरी परतले. हा गुंता सोडवायचा असेल तर राज्यातील सर्वश्रेष्ठ पंडित योगंधरायण यांचीच मदत घ्यायला हवी. योगंधरायण वार्धक्याने हल्ली दरबारी येत नसत. परंतु सर्व पंडितांना त्यांचा फार मोठा आधार वाटत असे.

सर्व पंडित महामुनी योगंधरायणाकडे गेले. सत्तेवर आलेल्या नवीन राजाने टाकलेला प्रश्न त्यांना सांगितला व या संकटांतून आपणच आम्हाला मार्ग दाखवावा, अशी विनंती केली. योगंधरायण म्हणाले -

''तुम्ही काळजी करू नका. येत्या पौर्णिमेला मीच दरबारात येऊन या प्रश्नाचे स्वत: जातीनेच उत्तर देईन.''

योगंधरायणांनी असे उत्तर दिल्यावर पंडित मंडळी स्वस्थ मनाने घरी गेली.

पौर्णिमेचा दिवस उजाडला. आज राजवाड्यामध्ये प्रजाजनांची खच्चून गर्दी होती. सर्व प्रजेला राजाने पंडितांना केलेला प्रश्न समजला होता. आजचा गुंता विलक्षण होता. काय देतील पंडित याचे उत्तर? सर्वांच्याच मनात कमालीचे औत्सुक्य होते. दरबार सुरू झाला. राजे जयसिंह सिंहासनावर विराजमान झाले. राजाच्या आज्ञेवरून प्रधानमंत्र्यांनी विद्वत्सभेपुढे परत तोच प्रश्न ठेवला :

''सर्व जगात श्रेष्ठ कोण ?''

सर्वांनी श्वास रोखले. महामुनी योगंधरायण उठले. त्यांच्या चेहऱ्यावर नंदादीपासारखे शांत तेज होते. सभागृहातील श्रीमूर्तीला त्यांनी वंदन केले. महाराजांना व प्रजेला अभिवादन केले व बोलायला सुरुवात केली.

"महाराज, सर्व जगात श्रेष्ठ कोण हा प्रश्न कधी कोणाला पडूच नये. कारण याचे उत्तर सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. परंतु हा प्रश्न आज तुम्हाला का पडावा याचेच मला आश्चर्य वाटत आहे."

जयसिंह महाराजांचे कान स्वतःचे कौतुक ऐकण्यास आतुर झाले होते. ते म्हणाले,

"मला पाल्हाळ नकोय. उत्तर हवंय." योगंधरायण शांत व धीम्या स्वरात म्हणाले,

"जगात श्रेष्ठ आपणच महाराज." सर्व पंडितांच्या चर्या म्लान झाल्या. जयसिंह महाराजांच्या मुखावर औद्धत्य चढले. प्रजा बुचकळ्यात पडली. महामुनींकडून हे उत्तर?

महामुनी परत शांतपणे म्हणाले, "राजेसाहेब, ज्याला आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित करून घ्यावेसे वाटते तो श्रेष्ठच नव्हे का? मग आपले श्रेष्ठत्व नाकारले तर आपण मला या राज्यातून काय या जगातूनही घालवून द्याल. परंतु परमेश्वराला तसे करता येणार नाही. कारण परमेश्वराच्या बाहेर काहीच नाही."

हे चतुर उत्तर ऐकून सर्व प्रजेची व पंडितांची तोंडे परत उजळली. अत्यंत चतुराईने योगंधरायणांनी त्या सर्वसाक्षी परमेश्वराचेच श्रेष्ठत्व मान्य केले होते ना!

७

# मोत्याचा कंठा

पंजाबचा महाराणा प्रतापसिंह अत्यंत प्रजाहिततत्पर राजा होता. प्रजेवर त्याचे मुलासारखे प्रेम होते. तो धर्मनिष्ठ होता, पण त्याची धर्माची व्याख्या अत्यंत व्यापक होती. मनाने तो अत्यंत उदार होता. प्रजेच्या सुखदु:खाशी समरस होणे म्हणजे राजधर्म पाळणे असे त्याला वाटे. राज्यामधील अत्यंत श्रीमंत माणसापासून गरीब माणसापर्यंत साऱ्यांची दु:खे कमी करण्यासाठी तो सतत झगडत असे. कोणीही दिलखुलासपणे राजाकडे यावे, तक्रार नोंदवावी. त्याची दखल घेतली जाई व राजा जातीने लक्ष घालून त्याला योग्य तो न्याय मिळेल अशासाठी खबरदारी घेत असे.

एक दिवस महाराजा रणजितसिंगाचा वाढदिवस होता. राजाची मोठी मिरवणूक राजरस्त्यावरून मिरवत चालली होती. पुढे वाद्ये वाजत होती. त्याच्यामागून अबलख घोड्याचे सुंदर पथक आपल्या टापांचा लयबद्ध आवाज करीत होते. मधोमध सोन्याच्या अंबारीत राजा रणजितसिंग बसला होता. मागे राज्यांतले श्रेष्ठ मानकरी चालत होते. राजाच्या डोक्यावर मखमलीची भव्य छत्री होती व त्याला सोन्याच्या छोट्या घंटा रुळत होत्या. अब्दागिरी हातात सोन्याच्या मुठीत अब्दागिरे घेऊन शेजारून चालले होते. हौद्याच्या मागच्या बाजूला बसलेले हुजरे महाराजांच्या शिरावर चवरी हलवीत

होते.

रस्त्यांच्या दुतर्फा लोकांची खूपच गर्दी होती. लोक दाटीवाटीने उभे होते. रस्त्यावर खाली रंगीत रांगोळीच्या पायघड्या घातल्या होत्या. लोक आपल्या लाडक्या राजावर फुले उधळत होते.

चालता चालता मिरवणूक एका मोकळ्या पटांगणाच्या शेजारून जात होती आणि अचानक एक नवल घडले. एक दगड सूंऽऽ करीत आला. तो महाराजांच्या अंगावरच आदळला. मिरवणुकीत एकच गडबड उडाली. बरोबरच्या सैनिकांमध्ये एकच धावपळ सुरू झाली.

"राजाला कोणी दगड मारला?"

"कोण हा उद्धट?"

"पकडा! पकडा त्याला!"

"चांगले सुळावर द्या!"

अशा आवाजांनी वातावरण कोंदून गेले. महाराज तसेच शांतपणाने अंबारीतच बसून होते. मुख्य प्रधान पुढे आले. त्यांनी फर्मान सोडले,

"गुन्हेगाराला ताबडतोब मुसक्या बांधून माझ्यापुढे उभे करा!"

त्या मोकळ्या पटांगणात सर्व शिपाई धावत गेले व एका म्हातारीच्या मुसक्या बांधून पुढे आले. म्हातारी लटपटत कापत होती. हातातली काठी लटपटत होती.

लोकांचा राग अनावर झाला होता. "आपल्या लाडक्या राजाला दगड मारण्याची ही हिमंत? आणि या थेरडीची?"

"थेरडीला चांगली दगडांनी ठेचून काढा."

लोकांचा गोंगाट वाढत चालला.

महाराज रणजितसिंग अंबारीतून खाली उतरले. त्याच्या पायावर कोसळत म्हातारी रडत म्हणाली -

“महाराज, गरिबाला क्षमा करा. मी जाणूनबुजून नाही मारला दगड. पटांगणातल्या त्या बोरीवरची बोरे मी दगडाने पाडीत होते. चुकून दगड लांब येऊन तो तुम्हाला लागला. मी मुद्दाम कसा मारीन हो राजांना दगड?”

“काय ग थेरडे, महाराजांची मिरवणूक येथून जाणार होती माहीत नाही तुला?”

“आणि काय ग, एवढी वाद्ये वाजताहेत तरी कान फुटले का तुझे?”

“काही नाही. थेरडी जहाबांज दिसत्येय.”

“नसतं ढोंग असावं म्हातारडीचं.”

लोकांचे आवाज चढत होते.

महाराजांनी हात वर केला. तशी सर्व प्रजा शांत झाली.

धीम्या पावलांनी महाराज एका पटांगणातून चालत गेले. बोरीच्या झाडाखाली उभे राहिले. त्या झाडाखाली काही बोरे पडली होती. एका टोपलीत म्हातारीने काही बोरे वेचून ठेवली होती. तिच्याकडे वळत महाराज म्हणाले -

“आजीबाई...”

म्हातारीने डबडबल्या डोळ्यांनी महाराजांकडे पाहिले. आजपर्यंत म्हातारडेऽ या नावाची तिला सवय होती आणि आज प्रत्यक्ष महाराज स्निग्ध आवाजात बहुमानाने तिला म्हणत होते, “... आजीबाई...”

“आजीबाईऽ एवढ्या बोरांचे काय करता?”

“बाजारात जाऊन वाटे घालून इकते पोराबाळांस्नी. पोरंबाळं इकत घेत्यात. चार पैशे होत्यात.”

“घरी कोण आहे?”

“नाही. मी येकलीच हाय, सरकार.”

"मूलबाळ नाही तुला?"

"व्हता योक लेक, पर लढाईमधी खपला त्यो." म्हातारीने फाटका पदर डोळ्याला लावला.

पांच मिनिटे शांतता पसरली. सर्वांची नजर महाराज आता म्हातारीला कोणती शिक्षा करतात याकडे लागली. इतक्यात, नवल घडलं. महाराजांनी आपल्या गळ्यातील टप्पोर मोत्यांचा कंठा काढला व म्हातारीच्या गळ्यात घातला. सगळ्यांच्या नजरा आश्चर्याने अवाक् झाल्या. शेवटी प्रधानाला राहवले नाही. तो म्हणाला -



"महाराज, आपल्याला त्या म्हातारीचा दगड लागला. तिला शिक्षा करायची सोडून आपण बक्षीस का दिलेत?"

महाराजांनी वर निळ्याभोर आकाशाकडे पाहिलं. आपले हात वर केले व धीम्या स्वरांत म्हणाले -

"अरे, या बोरीच्या झाडाला दगड लागला तर हे झाडसुद्धा या म्हातारीसाठी धुळुभुळु बोरे खाली टाकते. मी तर राजा! मी मोत्याचा कंठा द्यायचा नाही तर काय द्यायचं?"

राजाच्या आभाळाएवढ्या मनाने साऱ्यांचे डोळे आनंदाने पाणावले. आश्चर्याने व आनंदाने वेडी झालेली म्हातारी रणजितसिंगांच्या दिशेने पहात म्हणत होती. ती म्हणाली, "राजा, माझ्या सात पिढ्यांचे आयुष्य लाभू दे तुला."

# ८ धर्म

सकाळची शांत वेळ. पूर्व क्षितिजावर सूर्य पूर्ण वर आलाही नव्हता. वातावरणात सुंदर प्रसन्न गारवा भरून राहिला होता. नुकत्याच उमलणाऱ्या फुलांचा सुगंध व पक्ष्यांची मधुर किलबिल यांनी वातावरण आणखीनच प्रसन्न वाटत होते. 'गोदावरी नदीचे पाणी मंदपणे नाजूक आवाज घुमवीत वहात होते काठावर फारशी लगबग झाली नव्हती. दोन-चार खेडूत आपले स्नान उरकीत होते. एवढंच. गोदावरीच्या काठावर असलेल्या या भव्य वटवृक्षाच्या पलीकडे एक महात्मा प्रवाहामध्ये उभा होता. गोदावरीचे पाणी त्याच्या कमरेला स्पर्श करून पुढे जात होते. त्याने डोळे मिटले होते. हातामध्ये पाणी घेऊन पूर्वेच्या दिशेने एकाग्र मनाने तो परमेश्वराचे नामस्मरण करीत होता. हातामध्ये पाणी घेऊन त्याने तीन वेळा पाण्यामध्ये अर्घ्य सोडले. उगवत्या नारायणाला हात जोडले व तो काठाकडे परत येऊ लागला.

इतक्यात त्या महात्म्याचे लक्ष प्रवाहामध्ये गरगर फिरणाऱ्या एका पानाकडे गेले. त्याने पाहिले, पानावर एक विंचू आहे. तो पानाच्या कडेला येतो आहे. पाण्याचा स्पर्श होताच परत जीवाच्या कराराने पान पकडतो आहे. परंतु एवढासा जीव तग तरी किती धरणार? एकदम पाण्याच्या वेगात त्या पानाने गिरकी घेतल्यावर विंचू पानावरून खाली प्रवाहात पडला व पान मात्र

वेगाने पुढे गेले. त्या चिमुकल्या जीवाची जगण्याची धडपड सुरू झाली. तो महात्मा चटकन पुढे झाला व त्याने आपल्या ओंजळीमध्ये त्या विंचवाला पकडले व तो हळूहळू काठाकडे येऊ लागला. परंतु ओंजळीतील पाणी बोटांच्या फटीतून झिरपून पडून गेल्यावर त्या विंचवाला हाताचा स्पर्श झाला, 'अरे बापरे! पाण्यातून तर बचावलो! पण हे आणखीनच कोणते संकट आले?' या विचाराने त्या विंचवाने त्या महात्म्याच्या हाताला नांगी मारून दंश केला. त्या वेदनांनी महात्म्याने हात झटकला आणि विंचू परत प्रवाहात वाहून जाऊ लागला. पाण्याच्या प्रवाहात झप् झप् पावले टाकीत परत त्या महात्म्याचे विंचू पकडला. परत त्याने नांगी मारली तसा विंचू पाण्यात पडला. मग मात्र त्या महात्म्याने पाण्याच्या प्रवाहातून विंचू उचलला आणि मूठ घट्ट मिटली व तो झप् झप् काठाच्या दिशेने निघाला विंदू दंश करीतच होता. परंतु आता मात्र त्या महात्म्याला यश मिळाले. काठावर येऊन एका पानावर त्या विंचवाला त्याने सोडले. दुसऱ्या हाताच्या पंजाने मनगट घट्ट दाबून त्याने स्मितहास्य केले व तो चालू लागला.

काठावर आंघोळ करीत असलेल्या त्या तीन खेडुतांनी तो प्रकार पाहिला. त्यांच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. तिघेही त्या महात्म्याजवळ गेले व म्हणाले, "महाराज, आपल्याशी आम्हाला थोडं बोलायचं आहे."

तो महात्मा मागे वळला. हात जोडून म्हणाला - "काय आज्ञा आहे आपली?"

एक खेडूत म्हणाला - "महाराज, आम्ही पलीकडेच स्नान करीत होतो. आपणाला त्या विंचवाने नांगी मारून त्रास दिला तरी आपण त्याला कशासाठी काठावर आणीत होतात?"

"त्याचा जीव वाचावा म्हणून -" महात्मा शांतपणे धीर गंभीर

स्वरात म्हणाला.



"पण तो विंचू तर तुम्हाला सारखा दंश करीत होता. त्याला कशाला वाचवायचे?"

त्या महात्म्याने आभाळाकडे पाहिले. आपला हात वर करीत तो म्हणाला, "दंश करणे हा त्याचा धर्म! तो आपला धर्म सोडीत नव्हता, मग मी तरी माझा धर्म का सोडावा?"

तिघांही खेडूतांनी एकदम विचारले, "म्हणजे?"

"म्हणजे असं, माणसाचा धर्म संकटांत असलेल्याला मदत करणे. माझा धर्म मी पाळला." असे म्हणून तो महात्मा चालू लागला.

खेडुतांनी माना डोलावल्या व त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात हात जोडून माना लवविल्या. तो महात्मा म्हणजे संत एकनाथमहाराज होते.

# १ रहस्य

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. माणूस पृथ्वीवर स्वतंत्रपणे नुकताच राहू लागला होता. परंतु आपण कोणते काम करावे? कसे करावे? का करावे? कामासाठी कोणती साधने वापरतात याचे काही म्हणजे काही ज्ञान माणसाला नव्हते. त्यामुळे साधी साधी कामे करायला सुद्धा त्याला अती कष्ट पडायचे. शेवटी देवालाच दया आली. माणसाला हे सारं कुणीतरी शिकवले पाहिजे. म्हणून देवाने स्वर्गातूनच प्रेषित भूमीवर पाठवायचे ठरविले. पृथ्वीवर जाऊन तेथील लोकांना सहकार्य करण्याचे काम देवाने या प्रेषितावर सोपवले.

त्याचे नाव होते ऊ बिस्कोराम. देवाच्या आज्ञेने तो पृथ्वीवर आला व त्याने पृथ्वीवरील लोकांना शिकवायला सुरुवात केली. पृथ्वीच्या पोटात लोखंड, तांबे, पितळ असे विविध धातू होतेच त्याची माहिती, त्याचे गुणधर्म ऊ बिस्कुरामने सर्वांना समजून सांगितले. त्या धातूपासून विविध शस्त्रे व साधने त्याने तयार करून दाखवली. त्या साधनाचा उपयोग करून विविध कला निर्माण झाल्या. माणसाने लोखंडी फाळ वापरून नांगर बनवला व शेतीचे काम सुलभ झाले. लोखंडापासून पटाशी, हातोडी, खिळे, चुका नाना गोष्टी बनवल्या व माणसे सुतारकाम करू लागली. लोखंडापासून अवजारे बनविणारे लोहार झाले.

तांब्या-पितळेच्या सुंदर वस्तू व भांडी बनविणारे तांबट तयार झाले. असे विविध उद्योगधंदे निर्माण झाल्याने माणसे कामात गर्क राहू लागली. ऊ बिस्कोरामचे हे सारे शिकवण्यात खूप दिवस गेले. परत जाण्याचे दिवस आले तर एक पंचाईतच होऊन गेली. त्याला परत स्वर्गात जाण्याचा रस्ताच सापडेना. फार मोठी अडचण निर्माण झाली. नाईलाजाने ऊ बिस्कोराम पृथ्वीवरच राहू लागला. सर्व प्रकारच्या कलांमध्ये तो वाकबगार होताच. माणसे त्याचा फायदा घेऊ लागली. त्याच्याकडून सारखे काम करून घेऊ लागले. बिचारा कंटाळून जायचा. लोक तरी विचित्रच! त्याच्याकडून वाट्टेल ते काम करून घ्यायची. म्हणायची - "तू काय स्वर्गातून आलास ना? तुला यायलाच पाहिजे सारं."

एक दिवस गंमत घडली. अटीतटीचाच प्रसंग आला म्हणा ना! काही माणसांनी एक मातीचा माणूस तयार केला आणि गेली सारी ऊ बिस्कोरामकडे. बिचारा बिस्कोराम नुकताच उठला होता. घराच्या पुढील अंगणात माणसांचा हा घोळका. बिस्कोराम बाहेर आला व म्हणाला -

"आज सकाळी सकाळीच काय काम काढलं?"

"काम तसं सोपं आहे."

"पण आहे तरी काय काम?"

त्या जमावातला एक माणूस तो मातीचा पुतळा घेऊन पुढे आला आणि म्हणाला -

"ऊ बिस्कोराम. तुला वाट्टेल ते काम येते. होय ना."

"अरे, पण काम तर सांगाल?"

"हा मातीचा पुतळा आहे ना?"

"त्याचे काय?"

"त्याच्यामध्ये आम्हाला प्राण भरून पाहिजे."

"काय?" ऊ बिस्कोराम ओरडलाच.

"असं ओरडायला काय झालं? हा मातीचा पुतळा जिवंत करण्याचे रहस्य तुम्ही आम्हाला सांगितलेच पाहिजे."

ऊ बिस्कोराम चांगलाच चक्रावला. मुळात जे रहस्य फक्त परमेश्वरालाच ज्ञात असते ते कसं काय सांगणार? म्हणे मातीचा पुतळा जिवंत करा. डोकंच फिरलंय झालं या लोकांचं! काय करावे तेही त्याला सुचेना. नाही म्हणावं तर ही मूर्ख माणसे आपला छळ करीत राहणार पण हीच युक्ती येथून सुटण्याची आहे. त्याने लोकांना सांगितले.

"हे पहा मी विचार करतो आणि उद्या सांगतो." सर्व जमाव परत गेला.

रात्रभर ऊ बिस्कोरामने विचार केला. ही सर्व माणसे - यांनी आपण एवढं सहकार्य केले तरी वाईटच वागली तेव्हा यांना धडाच शिकवू या.

दुसऱ्या दिवशी परत सारा लोकांचा जमाव बिस्कोरामच्या अंगणात गोळा झाला. बिस्कोराम पुढे झाला। म्हणाला -

"तुमचा मातीचा पुतळा जिवंत करायला मला नक्कीच आवडेल. पण गमंत अशी आहे की जिवंत करायचे हे रहस्य मला वर स्वर्गात जाऊन परमेश्वरालाच विचारून यायला हवं. कारण मलाच ते माहीत नाही."

"छे! छे! तुम्ही वर गेलात आणि परतच आला नाहीत तर?"

"मग तुम्ही असं करा. एक पतंग तयार करा. मी त्याच्यावर आरूढ होऊन स्वर्गात जाईन. पतंगाची दोरी तुमच्याच हाती असणार. मी स्वर्गात गेल्यावर त्या पतंगावर माणसाला जिवंत करण्याचे रहस्य लिहून पाठवीन."

"पहा हं, नक्की ना? नाहीतर द्याल मला गुंगारा."

"नक्की लिहून पाठवीन म्हणजे पाठवीनच."

झालं! लोकांनी एक प्रचंड पतंग तयार केला. त्याला मजबूत लांबलचक दोरी. ऊ बिस्कोराम स्वर्गात गेला व पतंगावर रहस्य लिहून पतंग खाली धाडला.

लोकांना खूपच आनंद झाला. पृथ्वीवर सरकत येणाऱ्या त्या पतंगाकडे सर्व मंडळी कुतूहलाने पाहू लागली. पतंगावर काहीतरी लिहिले होते. पण असं काही होते की ते कुणालाच वाचता येईना. पृथ्वीवरची माणसे संतापली. ओरडू लागली. बिस्कोरामला ठार मारण्याची भाषा करू लागली.

वर बिस्कोराम नुसता हसत होता. त्याने रक्ताचे चार थेंब वरून पतंगावर टाकले. माणसांना वाटले ऊ बिस्कोराम खरंच मेला. त्यांना बरे वाटले.

वर बिस्कोराम मात्र हसत होता. माणूस खरंच किती मूर्ख आहे. आपल्याला सहकार्याचे बक्षीस काय दिले तर नुसता छळ! छान झाले! माणसाला पूर्ण ज्ञान कधीच मिळणार नाही! मनुष्याच्या जिवंतपणाचे रहस्य त्याला कधीच कळणार नाही. परमेश्वराने ते केवळ आपल्या हाती ठेवले. खरं पाहिलं तर परमेश्वराने ही कृपाच केली म्हणायला हवी. हे जिवंतपणाचे रहस्य जर या मूर्ख माणसाला खरंच कळलं असतं तर हा माणूस आणखी किती उन्मत्त झाला असता! तेव्हा हे छानच झाले! ते रहस्य अजूनही उकललं नाही आणि मानवाला केव्हाच उकलणार नाही.

(खासी लोककथेचे आधारे)

२०६५ ३/१३/०७
वा वा

# १० धनपुत्र

समतानगर तसं छोटंसंच राज्य. गावाजवळून श्रमदा नदी वहात होती. या गावाचे जणू जीवनच होती श्रमदा. तीन बाजूला डोंगर आणि मधे हे राज्य बसलेले. पूर्वेकडच्या डोंगराला श्रमदा वळसा घालून नगरात शिरायची, ती जरा खळाळतच. पण नगरात प्रवेश केल्या केल्या तिचे हे रूप शांत व्हायचं. समतानगराला श्रमदेने अगदी सुजलाम् सुफलाम् बनवून टाकले होते. गावातली वृद्ध माणसे कौतुकाने म्हणायची,

"आमची श्रमदामाय म्हंजे खरी माय आहे. श्रम करणाऱ्याला भरपूर देणारी. म्हणून तर श्रमदामाय."

तर काय! असं हे छोटंसं राज्य.

या राज्याचा राजा सुधन्वा आता वयस्क झाल्याने त्याने आपला मुलगा राजकुमार - 'जयकुमार' याला राज्यावर बसवले. खरं म्हणजे मंत्रिमंडळाला हे पसंतही नव्हते. तसे त्यांनी राजाला आडून सुचवूनही पाहिले. परंतु पुत्रमोहाने सुधन्वा महाराजांना वाटले,

'अंगावर जबाबदारी पडली की जयकुमार हळूहळू हे समर्थपणे पेलू शकेल."

परंतु होत होते मात्र निराळेच. जयकुमार होता शिकवल्या बुद्धीचा. राज्यकारभार चालवताना मंत्रिमंडळाचा योग्य सल्ला घेऊन

विचारविनिमय करून स्वत:च्या ठाम बुद्धीने निर्णय घेणे महत्त्वाचे. पण याच गोष्टीचा जयकुमारच्या ठिकाणी पूर्ण अभाव. याचा फायदा राजघराण्यातीलच एक व्यक्ती घेऊ पहात होती. ती म्हणजे जयकुमारचा मामा रतनराय. थोरले महाराज गादीवर असतापासून रतनराय राज्यकारभारात अशी ढवळाढवळ करायचा. परंतु अत्यंत शिस्तप्रिय सुधन्वा महाराजांनी त्याला योग्य जागा दाखवली होती. राणीसाहेबांचा भाऊ; त्यामुळे त्याला केवळ राज्यात एक नाममात्र अधिकारपद त्यांनी दिले होते. सुधन्वा महाराजांना जयकुमारच्या हाती राज्यकारभाराची सूत्रे सोपविताना त्याला समजुतीने सांगितले होते,

'हे पहा जयकुमार, राजा हा राज्याचा विश्वस्त असतो. राज्य हे त्याच्या स्वत:च्या उपभोगासाठी नसते. जास्तीत जास्त माणसांचे कल्याण हे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून मंत्रिमंडळाच्या मदतीने तू हे पुढे चालवायचंस. अधिकारपदाचा दुरुपयोग कोणालाही करू द्यायचा नाही. अगदी जवळच्या नात्यातली व्यक्ती असली तरी तिचे हित राजहितापुढे दुय्यमच."

सुधन्वा महाराज सर्व राज्यकारभार जयकुमारच्या हाती सोपवून नगराच्या एका बाजूला असलेल्या एका छोट्याशा गावी जाऊन राहिले. तेथे एक सुंदर शिवमंदिर होते. उर्वरित आयुष्य परमेश्वराच्या चिंतनात घालवावे असा त्यांचा विचार होता. काही मदत लागली तर जयकुमारने केव्हाही येऊन त्यांचा सल्ला घ्यावा असेही त्यांनी सांगितले होते. मंत्रिमंडळावर त्यांचा पूर्ण विश्वास होता.

जयकुमारने सुरुवातीच्या काळात मंत्रिमंडळाच्या मदतीने कामाला सुरुवात केली. अर्थात त्याच्या मामाला रतनरायला ही गोष्ट रुचत नव्हती. याच्यावर गोड शब्दांची मोहिनी घालून त्याने मंत्रिमंडळात प्रवेश केलाच. व आपल्या या अधिकाराच्या जोरावर अनेक

नालायक माणसे राज्यकारभारात घुसवली. पूर्वीच्या मंत्रिमंडळातील चार-दोन फक्त सेवक राहून बाकीच्यांना या नाही त्या कारणाने काम सोडावे लागले. सुधन्वा महाराजांचे या सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष होतेच. परंतु मुख्यप्रधान श्रीरंगराय जोपर्यंत आहेत तोपर्यंत आपल्याला काळजीचे कारण नाही असा त्यांचा विश्वास होता.

श्रीरंगराय अत्यंत कर्तबगार व्यक्ती होती. अत्यंत चारित्र्यवान, निष्ठावान् व निर्भय तितकाच ऋजू असलेल्या या माणसाबद्दल राज्यातील सर्व लोकांना आदर होता. रतनरायच्या मनात मात्र श्रीरंगराय सतत सलत राहायचा. रतनरायला सर्वांचीच हाव होती. वेळ पडल्यास तो राज्यही बळकाविण्यास कमी करायचा नाही याची श्रीरंगरायलाही कल्पना होती. नाना युक्ती करून त्याने राज्यातले धन प्राप्त करून घेतले होते. राज्यामधे एक 'धनवान्' माणूस म्हणून त्याचा लौकिक झाला होता.

दरबारातले अधिकारी रतनराय आला की त्याचे 'लक्ष्मीपुत्र' म्हणून हसून स्वागत करायचे. गर्वाने तो फुगून जायचा. श्रीरंगराय मात्र त्यांना कधी या नावाने हाक मारायचे नाहीत. ते नेहमी म्हणायचे, "या धनपुत्र" रतनराय सारं हसण्यावारी न्यायचा.

त्यादिवशी अशीच नागरिकांची सर्वसाधारण सभा होती. राज्यामधील प्रतिष्ठित नागरिक या सभेला हजर असायचे. अशी सभा सहा महिन्यांनी व्हायची. या निमित्ताने नागरिकांच्या प्रतिक्रियाही अजमावयाला मिळायच्या. सुधन्वा महाराजांनीच ही पद्धत सुरू केली होती. याची रतनरायला सवय नव्हती. नेहमी बैठकीला मागाहून यायचा.

महाराज जयकुमारही सभेला हजर झाले. इतक्यात घाईघाईने रतनराय दरबारात आले. जयकुमारलाही खरं म्हणजे राग आला. सर्व सरदार, मंत्र्यांनी हजर झाल्यावर राजेसाहेबांनी यायचं असा

रिवाज. पण रतनरायचे सारेच उलटे. अलीकडे - अलीकडे त्याचं वर्चस्वही जयकुमाराला डोईजड वाटायचं. पण बालायचं कसं? नात्याने मामा आणि आता तर मंत्रिमंडळातील एक. तितका परखडपणाही जयकुमारमधे नव्हताच. रतनरायचे आल्या-आल्या तोंडपुजेपणाने त्याच्या लोकांनी अभिवादन केले,

"या, या, लक्ष्मीपुत्र, आता सभेला शोभा येईल."

श्रीरंगराय गंभीर शब्द उद्गारले,

"या महाराज, तुमच्यासारख्या धनपुत्राने असा सभेचा खोळंबा करणे कितपत बरे दिसते?"

रतनरायने उत्तर देण्याच्या ऐवजी त्याचा एक खूषमस्कऱ्या सरदार म्हणाला

"लक्ष्मीपुत्राला, सारं साजून दिसते. चला सुरू करा आता सभा."

"पण मी म्हणतो, धनपुत्राने असे वागावेच का?"

रतनरायच्या लक्षात आले होतेच सारे लोक मला लक्ष्मीपुत्र म्हणतात. याच्या पोटात काय खुपतं न कळे! हा मात्र मला 'धनपुत्र' म्हणून संबोधतो. मोठ्या आढ्यतेने त्याने श्रीरंगरायला प्रश्न केला,

"आपण मोठे विद्वान. लक्ष्मी म्हणजेच धन. धन म्हणजेच लक्ष्मी. असे असताना आपण माझा उल्लेख धनपुत्र का म्हणून करता ते कळेल का?"

श्रीरंगरायांना चांगली संधी मिळाली. आयतेच राज्यातील जाणकार नागरिक हजर होते. ते उभे राहिले आणि धीरगंभीर स्वरात म्हणाले,

"रतनराय, लक्ष्मी व धन यांत खूप फरक आहें. तुम्ही धनपुत्रं, लक्ष्मीपुत्र नव्हे."

सर्वांनी श्वास रोखले. नागरिकांच्या मनात रतनरायबद्दल राग

होताच. या माणसाने राज्याची घडी विस्कटून टाकायला सुरुवात केलेली सर्वांना ज्ञात होतेच. अनेक भ्रष्टाचारी लोक मंत्रिमंडळात घुसले होते ते याच्याच आश्रयाने. श्रीरंगरायावर सर्वांचे लक्ष लागले ते पुढे म्हणाले,

"लक्ष्मी आणि धन समानार्थी वाटले तरीपण त्यांत एक मूलभूत फरक आहेच. जे धन राजमार्गाने येते ती लक्ष्मी. आणि आडमार्गाने येणारे ते धन. तो नुसताच पैसा किंवा धन. पुण्य नेहमी राजमार्गानेच येणार. पापाला हजार आडवाटा."

हा खुलासा ऐकल्यावर लोकांनी टाळ्या पिटल्या.

"चले जाव! रतनराय !" सभागृह दुमदुमले.

रतनराय रागाने हिरवा-पिवळा झाला. त्या विराट शक्तीला आवरणें अशक्य आहे हे जाणून रतनराय दरबारातून चालते झाले. जयकुमारनाही मनातून बरे वाटले. सुंठीवाचून खोकला गेला. जयकुमारांना श्रीरंगरायने समजावून सर्व गोष्टींची कल्पना दिली. जयकुमार मनाने चांगलाच. परंतु त्याची बुद्धी भ्रष्ट झाली होती. त्याने श्रीरंगरायला सांगितले,

"श्रीरंगराय, आपल्या जुन्या मंत्रिमंडळातील सर्व लोकांना सन्मानाने पाचारण करा."

# ११ मनीमाऊचा कोट

तशी ही कथा फार म्हणजे फार फार वर्षांपूर्वीची. आता फार दिवसांपूर्वीची म्हणजे तुमच्या आजोबांच्या पणजोबांच्या परत आजोबांच्या पणजोबांच्या असं अगणित वेळा केलं ना की अगदी त्याचवेळेची बघा. हं उगाच आकडेमोड करीत डोकं खाऊ नका. बालमित्रांनो, गोष्ट महत्त्वाची; काळ तसा महत्त्वाचा नाही म्हणा. कारण तो सांगताच येत नाहीये ना म्हणून.

तर काय झालं, एक होता मोत्या - म्हणजे कुत्रा. नाव काय बरं? हं आठवलं! त्याचं नाव आरंभ. एकदा हा आरंभ रानामधे गेला. थंडीचा कडाका होता. रात्र झाली तेव्हा एका झाडाच्या वाळलेल्या पाचोळ्यामधे गुडुप्प अंग मुडपून झोपी गेला. वाळलेल्या पानामुळे अंगाला छान ऊब आली. सकाळ झाली. बाहेर छान उन्हं पडली. आता उठायला हवं. नुसतंच लोळत पडले तर खायला कोण देणार बाबा? पोटात भूकही लागली होतीच. आरंभ उठला. हातानं पाय लांबवले. आळस दिला आणि निघाला शिकारीला.

रानात हिंडता हिंडता त्याला सापडला एक छान लोकरीच्या कापडाचा मऊ मऊ तुकडा. त्याने तुकडा उलटा सुलटा केला. थोडा वेळ पंज्यावर ठेवून दिला आणि त्याच्याकडे एक टक

आपला पहात बसला. आरंभला अगोदर गम्मत वाटली. कारण त्याच्या पंज्याला छान ऊब आली होती. आरंभच्या डोक्यात एक कल्पना चमकून गेली. आपण या लोकरीच्या तुकड्याचा ऊनसा कोट शिवून घेतला तर किती छान होईल. रात्री थंडी पण लागणार नाही. मग ठरलं तर. शिवायचा कोट. पण आपल्याला तर शिवताच येत नाही आणि आरंभला आठवलं. पलिकडच्या गावाच्या सीमेवर एक मनीमाऊ रहते. काय बरं तिचे नाव. हं. आठवलं. प्रारंभीबाई. त्यांच्याकडेच जावं. त्या देतील छान कोट शिवून.

तो लोकरीचा तुकडा घेऊन आरंभ कुत्रा गेला मनीमाऊ प्रारंभीबाईंकडे. प्रारंभीबाई डोळे मिटून उन्हं खात पाय लांब करून पहुडल्या होत्या. अंगणामधे जाऊन आरंभने जोरात हाक मारली,

"भूऽ... भूऽ... भूऽग. हं झोपलात काय हो अजून. आणि पाहुणे आले तरी कसलं झोपून राहताय हो तुम्ही?"

"माझा की नाही जरा डोळा लागला होता."

म्यॉंव् म्यॉव् करीत प्रारंभीबाईंनी उत्तर दिले.

"आपल्या तोंडातील लोकरीचा तुकड़ा पुढे करीत आरंभकुत्रा म्हणाला -

" हे घ्या. छान मऊ मऊ आहे. याचा मला छान कोट शिवून द्या. मी चांगले टोपलीभर मासे आणून देईन शिलाई म्हणून."

माशांचे नाव काढताच प्रारंभीबाईंचे डोळे चमकले. म्हणाल्या -

"चालेल. या उद्या मासे घेऊन. कोट शिवून ठेवते."

दुसऱ्या दिवशी आरंभ चांगले टोपलीभर मासे घेऊन मनीमाऊ प्रारंभीबाईंकडे गेला. प्रारंभीबाई माशाच्या वासाने टुणकन उठल्या. पण आपण कोट तर शिवलेलाच नाही याची प्रारंभीबाईंना आठवण

झाली. त्या आरंभला म्हणाल्या,

"हे पहा. आज मला कामात वेळ झाला नाही बघा. चार दिवसांनी नक्की देते बघा. पण माशांची टोपली मात्र ठेवून चला."

भोळा बिचारा आरंभ- त्याने माशाची टोपली ठेवली व तो निघून गेला. चार दिवसांनी परत आला. पुढ्यामध्ये लोकरीचा तुकडा घेऊन प्रारंभीबाई बसल्या होत्या. त्या म्हणाल्या- 'कोट करायला घेतला. पण उंदिराने काल रात्री कात्री पळवली बघा बिळात. आता ती सापडली की नक्की शिवून ठेवते बघा. झालं. बिचारा हिरमुसला आरंभ कुत्रा जड पावलांनी परत रानात गेला.

असं वर्षभर चाललं होतं. प्रत्येक वेळी प्रारंभीबाई काहीतरी कारण सांगायच्या. पण कोट काही द्यायच्या नाहीत. एक दिवस मग मात्र आरंभकुत्र्याने ठरवले आता थांबायचे नाही. आड नाहीतर पाड ! काय म्हणावं या वेळकाढूपणाला ? उद्या रानात सिंहमहाराजांनी सर्वांची खास सभा बोलावल्ये. प्रारंभीबाईंकडे जाऊन कोट घ्यायचा. आणि तो घालूनच सभेला जायचं. नाहीच झाला शिवून तर सरळ लोकरीचा तुकडा घ्यायचा आणि पांघरून घ्यायचा आणि जायचं.

झालं ! दुसरा दिवस उजाडला. आरंभ सकाळी सकाळीच प्रारंभीबाईकडे गेला. पण घराला मोठ्ठं कुलूप. प्रारंभीबाईचा पत्ता नव्हता. इतके दिवसांच्या अनुभवावरून आरंभला त्यांची लबाडी चांगलीच लक्षात आली होती. त्याला वाटलं पुढे कुलूप लावून खिडकीतूनही पळून गेल्या असतील या लबाड बाईसाहेब. म्हणून त्याने सर्व घराला फेरी मारली. पण एकही खिडकी उघडी नव्हती. शेवटी निराश होऊन जड पावलांनी तो सभेला निघाला.

थोडं अंतर तो चालून गेला आणि त्याने समोर पाहिले. प्रथम त्याने ओळखलेच नाही. प्रारंभीबाईंनी आपण दिलेल्या मऊमऊ

लोकरीचा छान कोट शिवला होता. अगदी अंगभर. आणि त्या ऐटीत चालल्या होत्या. आरंभकुत्र्याला अस्सा राग आला

कृतघ्न, लब्बाड, चोरटी... भूऽ... भूऽ... करीत तो जोरात म्हणाला. आता काढून घेतो माझा कोट. म्हणून आरंभने धूम ठोकली. माऊताईंच्या - प्रारंभीबाईंच्या दिशेने. परन्तु त्याच्या भूऽ.. भूऽ... आवाजाने प्रारंभीबाई भानावर आल्या व त्या जोराने पळत सुटल्या. आरंभच्या तावडीत सापडल्याच नाहीत. आरंभने अनेकवेळा प्रयत्न केला. पण प्रारंभीबाई काही सापडल्या नाहीत.

तेव्हापासून आरंभकुत्र्याचे वंशज आपल्या मूळ पूर्वजाचा हा छान कोट मिळवण्याच्या प्रयत्नात आहेत. आणि प्रारंभीबाईंचे सारे वंशज म्हणजे मांजरे छान लोकरीचा कोट कायम घालून हिंडताहेत. आता तो कोट त्यांच्या अंगाचाच भाग होऊन गेलाय.

बालमित्रांनो! म्हणूनच मांजर दिसले की कुत्रा त्या मांजराला पकडायला अजूनही धावताना दिसतो. तुम्ही पहाता ना नेहमी. त्याचे कारण एकच. मांजराने खूप खूप वर्षांपूर्वी त्यांचा चोरलेला कोट परत मिळवण्यासाठी. पण कुत्र्याला मांजर सापडत नाही आणि कोट राहिलाय मांजराकडेच.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. २०६५ दिनांक 3/3/08
विषय बा.वा. क्र.........

BVBK-0402965